रे.मु. नं. १३५/२०१८

**निशाणी क्रमांक ३६ खालील आदेश**

सदरचा अर्ज वादी यांनी वादी क्रमांक १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की, दाव्यातील वादी क्रमांक १ हे दिनांक २६.०५.२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे एक वारस आहेत. सबब, त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादींनी अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता, सदरचा दावा हा ठरावासाठी आहे. वादी क्रमांक १ यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल ठरविला असून वादी क्रमांक १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ केला आहे. दिवाणी प्रक्रिया संहीता १९०८ चा आदेश २२ नियम ०३ प्रमाणे वादी क्रमांक १ चे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. निशाणी क्रमांक ३६ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना वादी क्रमांक १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी तद्अनुषांगिक दुरुस्ती दाव्यात १४ दिवसांच्या आत करावी.

४. वादी क्रमांक १ यांचे वारस अभिलेखावर आल्याबाबतचा परिणाम दावा दुरुस्ती करुन प्रत्यक्ष वारस अभिलेखावर आल्यानंतरच्या प्रकरणाच्या पुढील भागास लागू होतील.

Digitally signed by DESHPANDE PRITESH CHANDRASHEKHAR Date: 2022.12.16 11:27:20 +0530

पेण (प्रितेश देशपांडे)

दिनांक १३.१२.२०२२ सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पेण